राज्यातील दूध उत्पादकांना शासनामार्फत करण्यात येणा-या दूध खरेदी दरात वाढ, शासकीय दूधाच्या विक्री दरात वाढ व सहकारी दूध संघ / संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत..................

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन पुरकपत्र क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १४ सप्टेंबर, २०११.

वाचा : १) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १९/पदुम-८, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११

२) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १८३ /पदुम-८, दिनांक ७ जुलै, २०११.

३) शासन निर्णय क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८, दिनांक २५ ऑगस्ट, २०११.

**शासन पुरक पत्र :**

शासन निर्णय समक्रमांक दिनांक २५ ऑगस्ट,२०११ अन्वये राज्यातील दूध उत्पादकांना शासनामार्फत करण्यात येणाऱ्या दूध खरेदी दरात वाढ, शासकीय दूधाच्या विक्री दरात वाढ व सहकारी दूध संघ / संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ मधील अनुक्रमांक ३ नुसार "राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ / एमएमपीओ नोंदणीकृत प्रकल्पाचे दूध खरेदी करताना प्रतिलिटर रु. २.४० एवढे कमिशन दिले जाते. सदर कमिशनमध्ये रु. ०.५० एवढी वाढ करुन ते रु. २.९० करण्यात आली आहे". सदर कमिशनमध्ये वाढ केलेल्या रु.०.५० ची वाढीव विगतवारी नुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कमिशन राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ / एमएमपीओ नोंदणीकृत प्रकल्प यांना देय राहील.

| अ.क्र. | तपशिल | पुवीचे प्रति लिटर कमीशन | वाढ केल्यानुसारप्र.लि. कमीशन अदा करणे |
|---|---|---|---|
| १ | अंतर्गत वाहतूक | ९५ पैसे | ११५ पैसे |
| २ | शितकरण आकार | २५ पैसे | ३५ पैसे |
| ३ | व्यवस्थापन खर्च | ४० पैसे | ४५ पैसे |
| ४ | कॅन खर्च | ०५ पैसे | ०५ पैसे |
| ५ | संस्था कमीशन | ७५ पैसे | ९० पैसे |
| | एकुण | २४० पैसे | २९० पैसे |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.मा. कांबळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०० ०१८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. गोरेगांव, मुंबई
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-४०० ०१८
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर/ मुंबई/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक/ व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवड नस्ती